दारं असा नेपथ्यासाठी उपयोग आणि एखादा विदूषक किंवा कालपुरुष याचं अनाकलनीय बोजड भाष्य म्हणजे प्रायोगिक नाटक असं समीकरण तयार झालं. थोडक्यात, या मधल्या काळात नाटकातली प्रायोगिकता हरवली आणि उरलं ते प्रायोगिकतेचं खोटं नाटक. पण नंतर हळूहळू प्रायोगिक रंगभूमी त्यातून सावरली गेली. आज चं.प्र. देशपांडे, गो.पु देशपांडे, संदेश कुळकर्णी, तुषार भद्रे, चंद्रशेखर फणसळकर, राजीव नाईक, मकरंद साठे, चेतन दातार इत्यादी मंडळी निष्ठेनं आणि स्वतंत्र विचारानं नवीन वाटा शोधायचा प्रयत्न करीत आहेत. ही वृत्ती वाढीला लागली तर प्रायोगिक चळवळ पुन्हा एकदा बहरेल.

स्पर्धेत सादर केल्या जाणाऱ्या नाटकांना सरसकट प्रायोगिक लेबल लावलं जातं. यातील फार थोडे अपवाद सोडल्यास बहुसंख्य नाटकांतून प्रायोगिकता शोधावी लागेल. केवळ व्यावसायिक रंगमंचावर सादर न केल्यामुळे ही नाटकं प्रायोगिक कशी ठरतील? प्रायोगिकता ही इतकी सहजसाध्य, स्वस्त गोष्ट नाही. या नाटकांना प्रायोगिक म्हटल्यानं उगाचच प्रायोगिक रंगभूमीच्या संख्यात्मक वाढीचा चुकीचा संदेश जातो. गुणात्मकतेत काही हाताला लागत नाही.

प्रायोगिक रंगभूमीच्या तरुण रंगकर्मींना मला काही गोष्टी आवर्जून सांगाव्याशा वाटतात. पाश्चात्य रंगभूमीवरच्या ॲबसर्ड थिएटरची नक्कल किंवा अनुकरण म्हणजे प्रायोगिकता नव्हे. आपल्या समाजजीवनाशी आपल्या मातीशी तिची नाळ जोडलेली असली पाहिजे. गिमिक्स म्हणजे वेगळं तंत्र नव्हे, प्रायोगिकता नव्हे. तुमची प्रायोगिकता ही आंतरिक असू दे. तुमची प्रायोगिकता ही अंतिमत: व्यावसायिक रंगभूमीवर आविष्कृत होणार आहे, व्यावसायिक रंगभूमी तिला आपली म्हणणार आहे. प्रायोगिक रंगभूमीची प्रगती ही व्यावसायिक रंगभूमीच्या परिवर्तनाला कारणीभूत होणार असल्यामुळे तिचं महत्व फार मोठं आहे. तुमची प्रायोगिकता साकळली, ती जर त्याच वर्तुळात फिरत राहिली तर ते खरं नाही आणि बरंही नाही. कुणासाठीच.

प्रायोगिक रंगभूमीला सतावणारी समस्या म्हणजे प्रयोगासाठी परवडणाऱ्या दरात रंगमंच उपलब्ध नाही. आज आविष्कारसारख्या संस्थेला, जी वर्षभर सातत्यानं कार्यरत असते, तिला कुठल्याही सुविधा नसलेल्या अडचणीच्या जागेत नाइलाजानं प्रयोग करावे लागतात. ही चिंतेची बाब आहे. मला यातून प्रयत्न करण्यासारखा एक मार्ग दिसतो. कित्येक शाळांची, महाविद्यालयांची, सरकारी, निमसरकारी आणि